International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# शाश्वत विकास आणि पर्यावरणाचा समाज जीवनावरील परिणाम

**कविता अशोक मोराडे**
*समाजशास्त्र व मानवशास्त्र विभाग*
*के.टी. एच .एम. महाविद्यालय, नाशिक*
***Corresponding Author - कविता अशोक मोराडे***
**DOI - 10.5281/zenodo.10934892**

**प्रस्तावना:**

मनुष्य व पर्यावरण यांचं नातं हे अगदी प्राचीन काळापासून आहे. पर्यावरण हा मानवी जीवनाचा एक आधार असून पर्यावरणाशिवाय माणूस मानवी जीवनाची कल्पना करणे अशक्यच आहे. वेळोवेळी निसर्गप्रेमींनी व पर्यावरणाच्या संगोपन व संवर्धनासाठी विशेष प्रयत्न केले आहे .त्यामध्ये राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील अनेक जणांनी प्रयत्न केलेले दिसून येतात आणि त्याच अनुषंगाने विशेष संवर्धन म्हणून मनुष्य प्राणी सावध होऊन पर्यावरणाची काळजी आणि महत्त्व जाणून घेण्यासाठी ५ जुन हा दिवस" जागतिक पर्यावरण दिन "म्हणून साजरा केला जातो. औद्योगिक क्रांतीमुळे जागतिकरण, खाजगीकरण, उदारीकरण या सगळ्या संकल्पना या सगळ्या संकल्पना अस्तित्वात आल्या .मानवाच्या गरजा वाढू लागल्या यातच मानव प्राणी आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा अमाप वापरामुळे पर्यावरणातला समतोल राखण्यासाठी आवश्यक असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीवर वरती हल्लाबोल करू लागला त्यातूनच पर्यावरणाचा ऱ्हास होऊ लागला .सुरुवातीच्या काळापासूनच पर्यावरणाविषयी जागरूकता लक्षात आणून दिली आहे.पर्यावरणाच्या संदर्भामध्ये मनुष्य प्राण्यास सावध केले. याच धर्तीवर विविध निसर्ग प्रेम व पर्यावरण संरक्षक व्यक्तींनी जंगल तोड पर्यावरण विरोधी धोरण पर्यावरण विरोधी आंदोलनात चळवळी या उभ्या केला ज्यामध्ये विशेषता चिपको चळवळ, नर्मदा बचाव आंदोलन आणि आरे बचाव आंदोलन हे अलीकडील भारतीय पर्यावरण विषयक चळवळी विषयी आपणास पाहता येते.

पृथ्वीही आपल्या सर्वांच्या हव्यासासाठी नसून आपल्या मानवी जीवनाच्या गरजा भागवण्यासाठी आहे. युरोप आणि इंग्लंड या देशांमध्ये जी औद्योगिक क्रांती झाली आणि त्यामुळेच ग्लोबल वॉर्मिंग म्हणजेच पर्यावरणाच्या समस्या जगाला सामना करावा लागला. पर्यावरण म्हणजेच पर्यावरण+आवरण बनलेले आहे.आपल्या सभोवतालचे आवरण मग ते भौतिक असो किंवा

रासायनिक असो किंवा जैविक असो या सर्वांचा कोणत्या प्रकारे सजीव व परिसंस्थेच्या लोकसंख्या आणि त्यांचे स्वरूप जीवनमानावरती परिणाम होतो .आजच्या भौतिकवादी युगात मानवाने वरील सर्व घटकांचा सुख सुविधांसाठी जास्तीत जास्त शोषण केले आहे. आजच्या औद्योगीकरण व शहरीकरण यामुळे पर्यावरणामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये प्रदूषण कारण ठरले आहे पण आपण विकासामध्ये इतके अडकून पडला आहोत की आपल्याला पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे याकडे लक्ष जात नाही. विकास हा समाजाचा मूलभूत गरजा नुसार झाला पाहिजे . पर्यावरणाचे संवर्धन झाले पाहिजे याकरिता शाश्वत विकास ही संकल्पना उदयास आली.

**संशोधनाचा उद्देश:**

१) शाश्वत विकासाबाबत अध्ययन करणे

२) पर्यावरण संवर्धन आधुनिक काळाची गरज आहे याबाबत अध्ययन करणे

३) पर्यावरणाच्या संदर्भात होणाऱ्या चळवळींचा अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून केवळ दुय्यम साधने वर आधारित आहे त्यांचे संकलन करताना क्रमिक पुस्तके ,संदर्भ ग्रंथ वर्तमानपत्रे ,मासिके ,प्रकाशित आणि प्रकाशित अहवाल इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे .

**पर्यावरण:**

पर्यावरण हा अत्यंत व्यापक व सर्वसमावेशक शब्द असून त्यामध्ये हवा जमीन जंगल पाणीसागर व सागरातील साधन संपत्ती इत्यादींचा समावेश होतो अशा सर्व संपत्तीचा विवेक पूर्ण वापर व तिचे जतन व वृद्धी करणे आवश्यक मानले जाते .कारखाने उद्योगधंदे यामधून निघणाऱ्या वायूमुळे हवेचे प्रदूषण त्यातून निघणाऱ्या प्रदूषित गोष्टी नदी नाल्यांमध्ये सोडून दिल्यामुळे होणारे पाण्याचे प्रदूषण, आकाशातील ओझेन वायुचे प्रमाण कमी, वायु प्रदूषणामुळे होणार परिणाम आणि त्यामुळे सूर्यकिरणांचा मानवी जीवनावर होणारा विघातक परिणाम या सर्वांचा विरोध करण्याची गरज निर्माण झाली. विकासाच्या नावाखाली आणि आधुनिक संस्कृतीच्या चेनीसाठी व हौसेसाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तूंसाठी होणारी जंगलतोड नद्यांची पाणी आढळून होणारी मोठी धरणे यांनाही विरोध करण्याची आवश्यकता निर्माण झाली. आदिवासींचे जीवन हे जंगलातच अवलंबून होते तरीही परंपरेने त्यांनीच जंगलांची संरक्षण केले. जीवन जगण्यासाठी आवश्यक तेवढी वृक्षतोड केली .त्या उलट जंगल ठेकेदार व पेपर मिल लोक हे मात्र, अमाप आणि अवैध जंगल तोड करतात असे दिसू लागले.

१) चिपको आंदोलन-ही चळवळ पर्यावरण चळवळींपैकी सर्वात प्रसिद्ध पर्यावरण चळवळ पैकी

एक आहे. पश्चिम हिमालयातील अलकनंदा ही ड्रेनेज बेसिनच्या पर्यावरणीय समस्या कडे लक्ष वेधले व हिमालयातील जंगलांना नष्ट होण्यापासून वाचवण्यासाठी चिपको चळवळ महत्त्वाचा उगम मार्ग आहे

२) नर्मदा बचाव चळवळ:_नर्मदा नदी खोरे प्रकल्प विरोधाचा संघर्ष ही भारतातील सर्वात प्रसिद्ध चळवळ नर्मदा ही भारतीय प्रकल्पातील सर्वात मोठी पश्चिमेकडील वाहणारी नदी हे सर्व महाराष्ट्रातील मेघा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असून या प्रकल्पामुळे विस्थापित झालेला लोकांच्या पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करत आहे.

३) झारखंड जंगल बचाव चळवळ- 2000 मध्ये झारखंड मधील आदिवासींच्या वन हक्कांच्या पुनर्विस्थापनेसाठी ही मोहीम सुरू करण्याच्या उपक्रमातून ही चळवळ उदयास आली.

४)बारसु आंदोलन :_कोकण किनारपट्टीचे संरक्षण व्हावे कोकण किनारपट्टी लगत असणाऱ्या साखरी नाटे व बारसु येथील स्थानिक मच्छीमार यांनी रिफायनरी व अणुऊर्जा प्रकल्पाच्या संदर्भात विरोध दर्शविलेला आहे. यात महिलांनी मोठ्या प्रमाणात आंदोलनात सहभाग घेतला .

**शाश्वत विकास:**

शाश्वतता म्हणजेच अनंत काळापर्यंत टिकून ठेवणे शाश्वतता म्हणजेच त्याला इंग्रजीमध्ये sustainable असा हा शब्द आहे . हा शब्द लॅटिन भाषेतील sustainers या शब्दापासून तयार झाला आहे .त्याचा अर्थ टिकून ठेवणे, धरून ठेवणे असा होतो. विकास सामाजिक ,आर्थिक पद्धतीनेही होत असतो शाश्वत विकास म्हणजेच नैसर्गिक संसाधनाची संरक्षण संवर्धन करणे असाही होतो. त्याची व्याख्या "जो विकास भावी पिढ्यांच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो त्या विकासाला शाश्वत विकास असे म्हणतात. शाश्वत विकास म्हणजेच चिरंतन व चिरकाल टिकणारा विकास . शाश्वत विकासासाठी शिक्षण हे जरी औपचारिक असले तरी त्यांचा रोजच्या व्यावहारिक व सामाजिक जीवनाशी संबंधित शाश्वत विकास शिक्षणामुळे समस्या सोडवण्याच्या क्षमतेमध्ये सहकार्य व माहिती आदान-प्रधानांमध्ये वाढ होते

गरज ही संकल्पना मानवाच्या अति महत्त्वाच्या गरजांची निमित आहे. सद्यस्थितीमध्ये लाखो लोकांना पुरेसे अन्न व्यवस्थित घर ,स्वच्छ पाणी आणि पायाभूत व प्राथमिक शिक्षण मिळत नाही या वाक्यावरून असे स्पष्ट होते की मानवाच्या अति महत्त्वाच्या पायाभूत गरजा पूर्ण होणे आवश्यक आहे .पण याचबरोबर शाश्वत विकासामध्ये भविष्यातील पिढीने आपल्या गरजा या नैसर्गिक संसाधनांचा हास न करता किंवा नष्ट न करता पूर्ण करणे हे तेवढेच महत्त्वाचे आहे .यामध्ये पाण्याची संसाधने विविध परिसंस्थेचे उत्पादने हवेची गुणवत्ता या बाबींचा समावेश होतो.

विकासाचा पारंपारिक अर्थ असा होतो की आर्थिक सुबत्ता असणे किंवा दाग दागिने आणि सर्व सोयीसुविधा असणे होय पण व्यक्तिगत कौटुंबिक व सामाजिक सुबत्ता ही इतर काही घटकांवर अवलंबून असते हे घटक कमाई पेक्षाही वेगळे आहेत. शाश्वत

विकास हा आर्थिक विकासापेक्षा मोठा आहे कमी कालावधीत झालेला विकास हा जास्त काळ टिकू शकत नाही तो अशाश्वत होऊ शकतो.

विकास हा संसाधनाच्या वापरावर अवलंबून आहे. त्यामुळे शाश्वत विकासाच्या दृष्टीने वाटचाल करायची असेल तर संसाधने वापरामध्ये बदल करणे आवश्यक आहे. सध्याच्या संसाधनाचा अतिवापर करण्याच्या पद्धतीमुळे प्रदूषण वाढत चालले आहे .जे आपल्या पर्यावरणाचे नुकसान करते.

अलीकडील काळामध्ये उपभोक्ता वाद आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनला आहे. समाजामध्ये श्रीमंत आणि वंचित गट संसाधने असमान वापरतात. आपल्या अत्याधुनिक संसाधन वापरामुळे अतिप्रमाणात कचरा तयार होतो. आपल्या पर्यावरणाच्या पुढील गोष्टी प्रतिबंध करण्यासाठी या आपल्या जीवनशैलीत बदल करणे आवश्यक आहे. आपल्यापैकी प्रत्येक जण संसाधनाचा वापर हा मोठ्या प्रमाणामध्ये करून पाऊल खुणा ठेवत आहे या पाऊलखुणा कमी करण्याची आज गरज आहे .भविष्यासाठी आपली नैसर्गिक संसाधन वाचवण्याची सकारात्मक विचारांची गरज आहे.

आज भारतात जरी वेगाने लोकसंख्येत वाढ होत असली तरी वेगाने औद्योगीकरण आणि संसाधनांचा वापर होत असला तरी आज देशात नैसर्गिक संसाधने आहेत. म्हणून त्यांचे संरक्षण करण्याची गरज आहे. G-20 च्या शिखर परिषदेमध्ये 2030 पर्यंत आपल्याला शाश्वत विकासाची ध्येय गाठायचे आहे .त्याकरता पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करणे गरजेचे आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) गुहा रामचंद्र (२०००) "पर्यावरणवाद ":एक जागतिक इतिहास"

२) अमृता बाविस्कर१९९५ : नर्मदा बचाव आंदोलन आदिवासी समूहात प्रत्यक्ष सहभागी

३) भांडारकर ( १९८५) सामाजिक संशोधन पद्धती नागपूर महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती

४) सुमी कृष्णा १९९६ पर्यावरण राजकारण :पीपल्स लाईव्ह अँड डेव्हलपमेंट चॉईस

५) पर्यावरण आणि शाश्वत विकास स्टडी सर्कल पब्लिकेशन

६) http :// www.loksatta .com